ePaper

## चिखली कुदळवाडीतील 18 लाख 36 हजार चौरस फुटांचे बांधकाम जमीनदोस्त!

| वर्ष - 8 | अंक - 205 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 9 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



### आतील पानांत


- विराटच्या अनुपलब्धतेमुळे संधी!
- मेस्सीच्या मुलाचे तब्बल ११ गोल
- नक्षलवादाला खतपाणी घालणारा अजेंडा
- 'अयोध्या' पराभवाचा बदला घेतला


## 27 वर्षांचा वनवास संपला!

# दिल्लीत कमळ फुलले!

### भाजपने दिल्ली जिंकली, काँग्रेस परजीवी, शून्याची डबल हॅट्ट्रिक

। नवी दिल्ली । महाईन्यूज

**भारतीय जनता पक्षाने दिल्ली विधानसभा निवडणुकीत जोरदार मुसंडी मारली आहे. या निवडणुकीत भाजपने आम आदमी पक्ष आणि काँग्रेसचा सुपडा साफ केला आहे. या विजयासोबतच भाजपने आपला 27 वर्षांचा दुष्काळ दूर केला आहे. सत्ताधारी आम आदमी पक्षाचा खुर्चीतून खाली खेचत भाजपने विजय मिळवला आहे. विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा सफाया झाला. त्याचवेळी काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. गेल्या अनेक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला शून्य फोडता आला नाही. त्याचवरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसला घेरले आहे. त्याचवेळी काँग्रेस त्यांच्या आघाडीतील पक्षांना संपवण्याचे कसे काम करत आहे, हे सांगून इंडिया आघाडीला सावध केले.**



### आप गेली, भाजप आली...

दिल्ली विधानसभेच्या 70 जागांसाठी 5 तारखेला मतदान झालं. आणि 8 फेब्रुवारी रोजी निकाल आला. यातील 48 जागांवर भाजप तर 22 जागांवर आपचा विजय झाला. आपने 2015मध्ये 67 आणि 2020मध्ये 62 जागांवर विजय मिळवला होता. म्हणजे आपला या निवडणुकीत 40 जागा गमवाव्या लागल्या आहेत.

### मोदी सरकारचा अर्थसंकल्प

केंद्रीय अर्थसंकल्प 1 फेब्रुवारी रोजी जाहीर झाला. या अर्थसंकल्पात सर्वात मोठी घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली. ही घोषणा म्हणजे 12 लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले. पूर्वी 7 लाख रुपयांच्या उत्पन्नावर कर भरावा लागत नव्हता. पण आता मर्यादा वाढवून थेट 12 लाख रुपये करण्यात आली. मोदी सरकारने केलेल्या या घोषणेमुळे मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. याच घोषणेमुळे मध्यमवर्गीय लोक मोठ्या संख्येने मतदान करण्यासाठी बाहेर पडले आणि भाजपला मतदान झाल्याचं बोललं जात आहे.

### गेल्या निवडणुकीत जातीय वातावरण

2020 मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान



दिल्लीतील वातावरण खूपच तणावपूर्ण होते. शाहीन बाग ते जाफराबाद मेट्रो स्टेशनपर्यंत, मुस्लिम समुदायातील लोक सीएए-एनआरसी कायद्यांवरून केंद्र सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरून निषेध करत होते. काही नेत्यांच्या आक्षेपार्ह विधानांमुळे वातावरण तणावपूर्ण झाले होते. या सर्वांचा फटका भाजपला बसला होता. पण यंदाच्या निवडणुकीत भाजपने व्यवस्थित नियोजन केले.

### आपच्या बालेकिल्ल्यात भाजपची एन्ट्री

मुस्लिम बहुल भागात आप आणि काँग्रेस दोघांनाही मोठे नुकसान सहन करावे लागले. काँग्रेस आणि आम आदमी पार्टी वेगवेगळे लढले. त्यामुळे अनेक जागांवर तिरंगी लढत झाली. याचा फायदा भाजपला झाला. येथील बहुतेक जागांवर त्यांनी आघाडी घेतली. असदुद्दीन ओवैसी यांचा एआयएमआयएम पक्ष दिल्लीतील मुस्लिम बहुल भागात भाजपला मागे टाकण्यात अपयशी ठरला.

### आपचं 2100 रुपये तर भाजपचं 2500 रुपयांचं आश्वासन

अरविंद केजरीवाल यांनी निवडणूक प्रचारादरम्यान म्हटले होते की, जर भाजप सत्तेत आला तर मोफत वीज आणि पाणी योजना बंद केल्या जातील. तर भाजपने दिल्लीत सुरू असलेल्या सर्व सुविधा राखण्याचे आश्वासनही दिले होते. अरविंद केजरीवाल यांनी महिलांसाठी 2100 रुपये देण्याच्या आश्वासनाविरुद्ध, भाजपने 2500 रुपये देण्याचे आश्वासन दिले होते.

### मोठे नेते, मोठा पराभव

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे अनेक मोठे चेहरे आपला मतदारसंघ राखू शकले नाहीत. त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. बडे नेते पडण्याच्या या यादीत फक्त आपचे नेते नाहीत तर भाजपचेही नेते आहेत. आपचे नेते, माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघात पराभूत झाले. तर मतदारसंघ बदलूनही उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया पराभूत झाले. आपचे माजी आरोग्य मंत्री सत्येंद्र जैन, कॅबिनेट मंत्री सौरभ भारद्वाजही पराभूत झाले आहेत.

### दिल्लीच्या जनतेने दिलेला कौल

“ भाजपच्या विजयाबद्दल त्यांचे अभिनंदन. जनतेने त्यांना बहुमत दिले आहे. मला आशा आहे की, ते लोकांच्या अपेक्षा पूर्ण करतील. आम्ही विरोधी पक्षाची भूमिका बजावू.
**- अरविंद केजरीवाल,** राष्ट्रीय संयोजक, 'आप'

“ आम्ही जनादेश स्वीकारतो. मी जिंकले आहे पण ही वेळ आनंद साजरा करण्याची नाही तर भाजपविरुद्ध लढाई सुरू ठेवण्याची आहे.
**-अतिशी,** मुख्यमंत्री दिल्ली

“ हे निकाल येणारच होते. प्रत्येक सभेतून हे स्पष्ट झाले की, लोकांना बदल हवा होता. त्यांनी बदलासाठी मतदान केले. काँग्रेसचा विचार केला तर अधिक मेहनत घ्यावी लागेल.
**-खासदार प्रियंका गांधी,** काँग्रेस सरचिटणीस

# महापालिकेच्या निवडणुका कधी होणार?

## निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद सुरू

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाचा युक्तिवाद सुरू आहे. ओबीसी आरक्षणावर लवकरच निर्णय होईल. त्यानुसार न्यायालय निवडणूक घेण्यास मान्यता देईल. फेब्रुवारीत निकाल आला. तर, एप्रिल महिन्यात निवडणुका होऊ शकतील, असा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी केला.**



पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकारांशी बोलताना बावनकुळे म्हणाले, 'आता खूप दिवस महापालिका नगरसेवकाविना राहू नयेत. लवकरच या निवडणुका होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. लवकर निकाल देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली जाणार आहे. फेब्रुवारीत निकाल आला तर एप्रिल महिन्यात निवडणुका होऊ शकतात. राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका जाहीर करताच महाराष्ट्र शासन मनुष्यबळ, व्यवस्था उपलब्ध करून देईल. त्यामुळे निवडणुकीसाठी सज्ज रहावे. काहीही करून पिंपरी-चिंचवड महापालिकेची आगामी निवडणूक जिंकायची आहे. त्यासाठी सदस्य नोंदणी वाढवावी. चार लाख सदस्य शहरातून वाढावेत. प्रत्येक बुथवरून पाच टक्के सक्रिय सदस्य करावेत. सदस्य नोंदणीसाठी शहराचे दोन जिल्हे करावेत'.भाजप स्वबळावर निवडणूक लढविणार आहे का, याबाबत विचारले असता ते म्हणाले,'महापालिकेची निवडणूक स्थानिक आहे. त्यामुळे स्थानिक कमिटीला विश्वासात घेऊन निर्णय घेतला जाईल. महाराष्ट्र म्हणून महायुतीने सोबत लढले पाहिजे असा निर्णय घेतला आहे. पक्ष आणि मंत्र्यांमध्ये समन्वय रहावा, खात्याचे निर्णय जनतेपर्यंत पोहोचवेत यासाठी भाजपच्या मंत्र्यांकडे पक्षाच्या कार्यकर्त्यांची नियुक्ती केली आहे',

असेही त्यांनी सांगितले.२७ वर्षानंतर दिल्लीच्या तख्तावर भाजपचा मुख्यमंत्री विराजमान होणार आहे. असल्याचे' भाजप प्रदेशाध्यक्ष, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. पिंपरी पत्रकारांशी बोलताना बावनकुळे म्हणाले, 'डबल इंजिन सरकार विकास करू शकते, हे देशाच्या जनतेने स्वीकारले आहे. मोदी यांच्या नेतृत्वात जनतेला विकास दिसत आहे. त्यामुळे देशाच्या ७५ टक्के भूभागावर भाजपचे सरकार आहे. दिल्लीतील विजय ऐतिहासिक आहे. काँग्रेस स्वकर्तुत्वाने दिल्लीत हरली आहे.

काँग्रेसने जनतेच्या विकासाचा मार्ग निवडला नाही. आता काँग्रेस मतदान यंत्राला दोष देईल. सकाळचे नऊचे महान प्रवक्ते बोलायला सुरुवात करतील असे म्हणत नाव न घेता' त्यांनी खासदार संजय राऊत यांना टोला लगविला.'काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी माझ्या कामठी विधानसभा मतदारसंघावर गडबड झाल्याचा आक्षेप घेतला आहे. त्यांनी या मतदारसंघाचा अभ्यास केला पाहिजे. येथे सलग २५ वर्षापासून भाजप जिंकत आहे. गांधी यांनी २०२९ ची निवडणूक कामठी विधानसभेतून लढवी असे माझे आव्हान आहे. मी त्यांच्या विरोधात निवडणूक लढण्यास तयार असून चितपट केल्याशिवाय राहणार नाही.

### काँग्रेसला दिल्लीच्या जनतेने धु-धु धुतले

एकनाथ शिंदे नाराज नाहीत. ते त्याग करणारे नेते आहेत. २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी शिंदे यांना मुख्यमंत्री होऊ दिले नाही. मी आणि माझा मुलगा यात ठाकरे फसले. त्यामुळे वाटोळे झाले. महायुती सरकार व्यवस्थित सुरू आहे. एकनाथ शिंदे चार खात्याचे मंत्री असून चांगले काम करत आहेत. महायुती मजबूत आहे. पुढची २५ वर्षे महाराष्ट्रात महायुती सरकार चालवेल. विकसित महाराष्ट्र करेल, असेही बावनकुळे म्हणाले.अरविंद केजरीवाल आणि काँग्रेसला दिल्लीच्या जनतेने धु- धु धुतले. अशी प्रतिक्रिया भाजप च्या विजयानंतर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये बोलत होते. स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप चषक निमित्त ते पिंपरी- चिंचवडमधील सांगवी मध्ये आले होते. यावेळी त्यांनी राहुल गांधी आणि संजय राऊत यांच्यावर ही सडकून टीका केली आहे. राहुल गांधी यांनी कामठी मतदारसंघातून निवडणूक लढवून दाखवावी मी त्यांना चितपट करेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

# जागतिक साखर बाजारपेठेत भारताची महत्वाची भूमिका

## हर्षवर्धन पाटील कॉफको इंटरनॅशनल परिसंवाद

।इंदापूर । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगातील साखर बाजारातील बदलत्या धोरणानुसार सतर्क राहणे आवश्यक आहे. जागतिक साखर बाजारपेठेत भारताची भूमिका कायम महत्वाची राहिलेली आहे. आगामी काळातही भारत हा जागतिक बाजारपेठेत मजबूत राहण्यासाठी व्यापारातील बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केले.**




कॉफको इंटरनॅशनल च्या राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीच्या सहकार्याने आयोजित शुगर कनेक्ट-२००२५ या परिसंवादामध्ये पुणे येथे श्री पाटील बोलत होते.

कॉफको इंटरनॅशनलच्या राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीच्या सहकार्याने आयोजित शुगर कनेक्ट-२००२५ या परिसंवादामध्ये पुणे येथे श्री .पाटील बोलत होते. ते पुढे म्हणाले, जागतिक साखर व्यापारामध्ये महाराष्ट्र राज्याची भूमिका देखील कौतुकास्पद राहिलेली आहे. सन २०२१-२२च्या हंगामात भारताने ११०लाख मे. टन साखरेची विक्रमी निर्यात केली तेव्हा ७०टक्के पेक्षा अधिकचे योगदान देऊन महाराष्ट्राने जागतिक साखर व्यापारात महत्वाची भूमिका बजावलेली आहे.

### निर्यातीच्या संधी वाढवू शकतात

साखर निर्यातीमधून चांगला फायदा मिळवण्यासाठी साखर कारखान्यांनी स्पर्धात्मक राहण्यासाठी उच्च गुणवत्ता राखण्यावर भर दिला पाहिजे. जागतिक बाजारातील मागणी अभ्यासपूर्णरित्या समजून घेऊन आणि त्यांची पूर्तता करून, साखर कारखाने भविष्यात निर्यातीच्या संधी वाढवू शकतात, असे मत पाटील यांनी याप्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी केले. यावेळी कॉफको इंटरनॅशनलचे साखर व्यापाराचे जागतिक प्रमुख जोस एडुआर्डो टोलेडो व मान्यवरांनी मनोगते व्यक्त केली. या परिसंवादामध्ये जगातील साखर व्यापारासंदर्भात सादरीकरण करण्यात आले. तसेच व्यापार चर्चा व प्रश्नोत्तर सत्र संपन्न झाले. कॉफकोचे भारतीय उपखंडातील साखर विभागाचे प्रमुख रवि कृष्णमूर्ती यांनी आभार मानले.

## १८ लाख ३६ हजार चौरस फुटांचे बांधकाम जमीनदोस्त!

# पिंपरी-चिंचवडमधील सर्वात मोठी कारवाई!

### चिखली कुदळवाडीत मोठ्या फौज फाट्यासह 42 एकर क्षेत्रावर धडक कारवाई



**-अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकानांची २२२ बांधकामे हटविली**

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चिखली येथील कुदळवाडी भागात आरक्षित जागा आणि विकास रस्त्यांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत पत्राशेड, कारखाने, गोदामे, भंगार दुकाने तसेच या परिसरातील अनधिकृत बांधकामे अशा एकूण २२२ बांधकामावर आज महापालिकेच्या वतीने पाडकाम कारवाई करण्यात आली.घेतला.**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आणि विविध क्षेत्रीय धडक कारवाई पथकांमार्फत १८ लाख ३६ हजार ५३२ चौरस फूट बांधकामावर कारवाई करण्यात आली.

महापालिका आणि पोलीस यंत्रणेने संयुक्तरित्या अतिक्रमण कारवाई राबविली. पोलीस आयुक्त विनयकुमार चोबे, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. त्यांनी प्रत्यक्ष कारवाईस्थळास भेट देऊन पाहणी केली तसेच प्रशासनाला सूचना देखील केल्या. या कारवाईदरम्यान अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, उपआयुक्त मनोज लोणकर, क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, सुचिता पानसरे, अमित पंडित, किशोर ननवरे, उमेश ढाकणे, अजिंक्य येळे, शितल वाकडे, श्रीकांत कोळप यांच्यासह कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता सहभागी झाले होते. पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने ही निष्कासन कारवाई करण्यात आली. अतिरिक्त पोलिस आयुक्त वसंत परदेशी यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपआयुक्त स्वप्ना गोरे, डॉ. शिवाजी पवार, बापू बांगर, संदीप डोईफोडे, विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली या परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.





### ४२ एकर क्षेत्रातील बांधकामावर धडक कारवाई

सुमारे ४२ एकर क्षेत्रात झालेल्या या कारवाईमध्ये महापालिका अतिक्रमण धडक कारवाई पथकामधील ४ कार्यकारी अभियंते, १६ उपअभियंते, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे १८० जवान, ६०० पोलीस आणि मजूर कर्मचारी सहभागी झाले होते. १६ पोकलेन, ८ जेसीबी, १ क्रेन आणि ४ कटर यांचा वापर निष्कासन कारवाईमध्ये करण्यात आला. शिवाय ३ अग्निशमन वाहने आणि २ रुग्णवाहिका देखील येथे तैनात करण्यात आल्या होत्या. महापालिका यंत्रणेसह पोलीस, वीज वितरण कंपनीचे अधिकारी कर्मचारी यात सहभागी झाले होते.

> शहरातील नियोजित विकास आरक्षणे आणि नागरिकांच्या सुविधांसाठी असलेल्या जागेवरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. कुदळवाडी भागात वारंवार आगीच्या घटना घडल्या तसेच वाहतुक दळणवळणाचे प्रश्न निर्माण झाले. अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या या बांधकामांमध्ये सुरक्षात्मक उपाय योजना न करता विविध व्यवसाय सुरू असल्याने अनेक अडचणी निर्माण होतात. या व्यवसायातून थेट नदीपात्रात दूषित पाणी सोडले जात होते, त्यामुळे पाणी तसेच हवा प्रदूषणात वाढ झाली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तरतुदींचे उल्लंघन करणे, कामगार कायद्याचे पालन न करणे अशा अनेक बाबी या भागात निदर्शनास आल्या होत्या. अशा परिस्थितीत कायद्याचे पालन करून महापालिकेने निष्कासनाची कारवाई केली आहे. यापुढेही अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील.
> **-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका


> महापालिकेच्या वतीने नागरी सुविधा पुरविताना त्या भागातील नागरी सुरक्षा देखील तितकीच महत्त्वाची आहे. त्या अनुषंगाने आगीसारख्या आपत्कालीन परिस्थिती निर्माण होण्यास कारणीभूत असलेल्या कुदळवाडी भागातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे.
> **-प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका



## भूमिका

**नायकनायिकांच्या गुलाबी प्रेमकहाण्या बहरू लागल्या होत्या आणि दूरदर्शन मात्र अमिताभ बच्चनचेच जुने चित्रपट दाखवत होतं. खासगी आणि सरकारीमधल्या या भेदाची सीमारेषा स्लोअर शहाणेला लगेच कळली नाही. त्यामुळे त्यानं मोठ्या पडद्यावर चित्रपट पाहणं ही कधी तरी करायची चैन समजून दूरदर्शनच्या ‘सरकारी’पणावर भाबडा विश्वास ठेवून बच्चनला मनोमन पुजलं होतं...**

# स्वत:ला बच्चन वगैरे समजणं!



स्लोअर शहाणेला भेटलेला कार्यकर्ता एनई-११८ या चारचाकी गाडीतून निघून गेल्यावर त्यानं रोजदिनीत ‘शोध स्वत:चा... समाजाचा’ या शिबिराच्या नावाबाबत जी नोंद केली होती, ती बरीचशी ॲकॅडेमिक होती. ‘शिबिराच्या नावातील ‘शोध समाजाचा’ हे शब्द वाचताना ‘शोध समजेचा’ असे वाचले, त्याला आता भूतकाळ म्हणावे का? का तो वर्तमानकाळ आहे? का भविष्य?’ अशी ती नोंद. पण, ‘तो’ कार्यकर्ता एनई-११८ मधून जाताना स्लोअरला जे वाटलं होतं, त्याचीच ही नेमकी नोंद होती असं मात्र म्हणता येणार नाही. मग तरी अशी नोंद त्यानं का केली असावी? या प्रश्नावर स्लोअरनं मनातल्या मनात दिलेलं उत्तर फार रोचक होतं. स्लोअरचं उत्तर होतं, की अशा नोंदी त्या नोंदवहीचं (स्लोअरच्या लेखी : रोजदिनीचं) वैचारिक मूल्य वाढवतात. तुमची लिखित विधानं एखाद्या ‘इझम’सारखी भासू लागतात आणि पुढे जाऊन त्यावर शोधनिबंध वगैरे लिहिले जाऊन, हे असं लिहिणाऱ्याला ‘सामाजिक शाबासकी’ मिळवणं सोपं जाऊ शकतं! कार्यकर्ता एनई-११८ मधून पंचतारांकित हॉटेलात जाऊन ‘हेच’ मिळवत असेल, तर आपण त्याबद्दल अशी नोंद करून, ‘तेच’ का साध्य करू नये, असं स्लोअरला वाटणं अस्वाभाविक नव्हतंच. पण, ते तितकंसं साहजिकही नव्हतं. म्हणूनच स्लोअरच्या या रोचक उत्तरापेक्षाही कार्यकर्त्याला चारचाकीतून जाताना पाहून स्लोअरला काय वाटलं हे अधिक महत्त्वाचं होतं. ‘कार्यकर्ता एनई-११८ मधून जाताना पाहून स्लोअरला आपल्या वन-सीटर लुनाकडे पाहून फार वैषम्य वाटलं होतं!’हे असं वाटणं हीच आपल्या मध्यमवर्गीय असण्याची सच्ची खूण आहे आणि ती जिवंत आहे, यानं स्लोअर शहाणे मनातल्या मनात ‘हुश्श’ झाला होता. कारण, रूढार्थानं ‘इझम’ वगैरे मानलं जाईल, असं काही आपण लिहू शकू, असं काही स्लोअर शहाणेला कधी वाटलं नव्हतं किंवा त्याचा स्वत:बाबत तसा काही गैरसमजही नव्हता. मध्यमवर्गीय असण्यातल्या ‘एस्केपिझम’मधला ‘रोमँटिसिझम’ त्याला कायमच भावत होता. किंबहुना, हेच दोन ‘इझम’ नव्वदच्या दशकातील त्याच्या ‘तरुण’ जगण्याला त्याच्याही नकळत आकार देत होते. पुढे स्वत:च्या पंचविसाव्या वाढदिवशी स्वत:लाच लिहिलेल्या पत्रात त्यानं, ‘बी द कोलंबस ऑफ युअर सोल’ हे वाक्य स्वत:लाच उद्देशून लिहून, हे दोन्ही ‘इझम’ प्रच्छन्नपणे कवटाळले वगैरेही होते. पण, ते नंतर. आत्ता विशीत शिरत असताना ते त्याच्या नकळत घडत होतं. तर असा हा स्लोअर शहाणे रोजदिनीत वैचारिक वगैरे लिहून, पण वास्तवात पळपुटेपणाचं व्यवच्छेदक लक्षण सांभाळून आयुष्याच्या एकेका पायरीवर सावधपणे पावलं टाकत होता. यातून त्याच्या मनात गुंते निर्माण होत नव्हते असं नाही. लिहिलं जाणारं आणि जगलं जाणारं यात असलेली तफावत त्याच्या मनात द्वंद्व निर्माण करायचीच. मग, त्यातून सुटकेसाठी त्यानं आधार घेतला स्वप्नांचा. स्लोअर खूप स्वप्नाळू होता. शिवाय, पुस्तकं वाचताना, चित्रपट पाहताना त्यातलं पात्र ‘आपलं’सं करणं त्याला चांगलं जमायचं. ‘एस्केपिझम’ अंगी बाणविण्यासाठी कल्पनाविलासात पारंगत व्हावं लागतं, हे स्लोअरनं चांगलंच जाणलं होतं आणि त्यानुसार ते आत्मसातही केलं होतं. सगळ्या स्वप्नांत त्याचं आवडतं स्वप्नं कोणतं असेल, तर ‘स्वप्न प्रत्यक्षात आल्याचं स्वप्न.’ स्लोअर तरुण असण्याच्या नव्वदच्या दशकातल्या परिस्थितीनं स्लोअरसारख्यांना हे स्वप्नं फार आत्मीयतेनं दाखवलं होतं. वस्तुस्थिती विपरीत असेल, तर स्वप्नं खूप चांगली पडतात, हे त्यानं ताडलं होतं. भेदाभेद, दंगल, भ्रष्टाचार, गरिबी असे नव्वदच्या दशकातले भाबडे शब्द जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण अशा ‘रोकड्या’ संज्ञांच्या वर्खात गुंडाळण्याचा तो स्वप्निल काळ होता. याच ‘स्वप्निल’ काळात एकीकडे चित्रपटाच्या पडद्यावर देखण्या नायक-नायिकांच्या गुलाबी प्रेमकहाण्या बहरू लागल्या होत्या आणि दूरदर्शन मात्र अमिताभ बच्चनचेच जुने चित्रपट दाखवत होतं. खासगी आणि सरकारीमधल्या या भेदाची सीमारेषा स्लोअरला लगेच कळली नाही.

## संपादकीय »

# 'डंकी'डंख!

***सारे काही कुर्बान करून अमेरिकेची वाट धरलेली बरी, असा विचार करणारे या देशात असंख्य आढळतात हा धोरणकर्त्यांचा पराभव ठरतो.***

अमेरिकेतून हाता-पायाला बेड्या घालून, लष्करी विमानात अवमानास्पदरीत्या ढकलून, चार ठिकाणी थांबत ४० तासांच्या डांबलेल्या प्रवासानंतर १०४ थकलेले आणि हरलेले भारतीय जीव दिल्लीत कसे उतरतील, याची चिंता वाटल्यामुळेच बहुधा त्यांना अमृतसरमध्ये उतरवण्याचा निर्णय केंद्र सरकारकडून झाला असावा. बेकायदा स्थलांतरितांची पाठवणी करताना बेड्या ठोकणे हा अमेरिकेच्या स्थलांतरित विभागाच्या नित्य कार्यवाही प्रक्रियेचा भाग असतो वगैरे स्पष्टीकरणवजा समर्थन परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दिलेलेच आहे. काही विमाने येत आहेत. हा मुद्दा अमेरिकेकडे उपस्थित करू, असे आश्वासन भारताच्या परराष्ट्र सचिवांनीही दिले आहे. त्यामुळेच, स्थलांतरितांना मिळालेल्या अवमानास्पद वागणुकीचा अर्थ सर्वसामान्य जनता, अनेक माध्यमे आणि सरकार व समर्थक अशांनी भिन्न प्रकारे लावला असे दिसते.

जागतिक तापमानवाढ नियंत्रणात ठेवणे अशक्यप्राय ठरू लागल्याचे दाखले एकापाठोपाठ समोर येऊ लागले आहेत. तापमान औद्योगिकीकरणापूर्वीच्या तापमानापेक्षा १.५ अंश सेल्शियसने कमी ठेवण्यासाठीची धडपड फोल ठरल्याचे स्पष्ट होऊन महिनाही उलटला नसताना आता चिंतेचा आणखी एक मुद्दा पुढे आला आहे.

# तापमान नियंत्रणाची गाडी चुकली?

तापमानवाढ २०४५ पर्यंत दोन अंश सेल्शियसपेक्षा कमी राखण्याचे लक्ष्य गाठणे अशक्य असल्याचे ‘एन्व्हायर्नमेन्ट सायन्स अँड पॉलिसी फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेन्ट’ या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनातून स्पष्ट झाले आहे. तापमानवाढीसंदर्भात जगभर अभ्यास सुरू असतात आणि त्यांचे नवनवे निष्कर्षही प्रसिद्ध होत असतात. तरीही हा अभ्यास महत्त्वाचा आहे कारण तो केला आहे जेम्स हॅन्सन यांच्या अभ्यासगटाने आणि हे हॅन्सन अतिमहत्त्वाचे कारण त्यांनीच जागतिक तापमानवाढीविरोधात सर्वप्रथम म्हणजे १९८८ मध्ये बिगूल फुंकले होते.अभ्यासगटाने तापमानवाढीच्या वेगामागची दोन मुख्य कारणे विशद केली आहेत. पहिले हे, की आपण जैवइंधनांच्या वापरावर पुरेसे नियंत्रण ठेवू शकलो नाही. हा मुद्दा तसा नेहमीचाच, मात्र दुसरा मुद्दा अगदीच वेगळा आहे. त्यांच्या निरीक्षणानुसार जहाजांमध्ये वापरण्यात येणाऱ्या



इंधनातील सल्फरचे प्रमाण कमी केल्यामुळेही तापमानवाढीत भर पडली आहे. इंधनांच्या ज्वलनातून जे एअरोसॉल्स म्हणजे सूक्ष्मतुषार उत्सर्जित होतात, ते एक प्रकारचे प्रदूषकच असते. या प्रदूषकांचे प्रमाण कमी करण्यासाठी इंधनातील सल्फरचे प्रमाण ३.५ टक्क्यांवरून ०.५ टक्क्यांवर आणण्यात यावे असा नियम आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेने २०२० मध्ये लागू केला. हॅन्सन यांच्या मते, त्यामुळे वातावरणातील प्रदूषके कमी तर झाली, मात्र हीच प्रदूषके सूर्याची किरणे परावर्तीत करण्यासही हातभार लावत. त्यामुळे वातावरण थंड राहण्यास मदत होत असे. त्यांचे प्रमाण घटल्यामुळे साहजिकच उष्णतेत भर पडली. हे म्हणजे प्रदूषके कमी झाली म्हणून तापमान वाढले, असेच म्हणण्यासारखे. त्यामुळे या वृत्ताविषयी जागतिक संशोधक समुदायात मतमतांतरे व्यक्त होऊ लागली आहेत.हॅन्सन यांचा अभ्यास हा अपुऱ्या निरीक्षणांवर आधारित असून त्यावर अधिक संशोधन होणे आवश्यक असल्याचे मत काही तज्ज्ञांनी व्यक्त केले. त्यांच्या म्हणण्यात तथ्य असेलही. पण म्हणून या प्रश्नाची तीव्रता कमी होत नाही. पृथ्वी शक्य तेवढी थंड ठेवण्याची वेळ हातची निसटून चालली आहे, हे ओरडून सांगणाऱ्या बातम्या रोज येत आहेत. मागचे वर्ष हे औद्योगिकीकरणापूर्वीच्या तापमानापेक्षा १.५ अंशाने अधिक तप्त असणारे पहिले वर्ष ठरल्याची बातमी जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यात आली. महिना संपतो न संपतो तोच हा महिना आजवरचा सर्वांत उष्ण जानेवारी ठरल्याचे ‘युरोपियन कोपर्निकस क्लायमेट सर्व्हिस’ने स्पष्ट केले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दिल्लीत राष्ट्रवादीला एकही जागा नाही

## दिल्लीत विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवली होती

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष ४८ जगांवर विजय मिळवत, तब्बल अडीच दशकांनंतर दिल्लीच्या सत्तेत पुनरागमन केले आहे. ही दमदार कामगिरी करताना भाजपाने सत्ताधारी आम आदमी पक्षाचा धुव्वा उडवला असून, माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह त्यांच्या मंत्रिमंडळातील अनेक मंत्र्यांनाही पराभवाची चव चाखावी लागली आहे. दरम्यान महाराष्ट्रात एनडीएचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादीनेही (अजित पवार) दिल्ली विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवली होती. मात्र, यामध्ये त्यांना यश मिळवता आले नाही. त्यांचा एकही उमेदवार विजयापर्यंत पोहचू शकला नाही.**



यानंतर प्रक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी एक्सवर भारतीय जनता पक्षाचे अभिनंदन केले असून, त्यांच्या पक्षाला या निवडणुकीत यश का मिळाले नाही, याचे विश्लेषण केले जाणार असल्याचे म्हटले आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे दिल्ली विजयासाठी अभिनंदन करताना आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, “दिल्ली विधानसभेतील निर्णायक विजयाबद्दल, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी नड्डा यांचे मनापासून अभिनंदन. दिल्लीत स्थापन होणाऱ्या नवीन सरकारला उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा. दिल्ली विधानसभा निवडणुकीत ‘एनडीए’चा प्रमुख घटकपक्ष असलेल्या भाजपाला मिळालेल्या ४० हून अधिक जागा या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर दिल्लीकरांनी व्यक्त केलेल्या विश्वासाचे प्रतिक आहेत. केंद्र आणि दिल्ली विधानसभेतही पंतप्रधानांच्या विचारांचे डबल इंजिन सरकार आल्याने दिल्लीच्या विकासाला दुप्पट गती मिळेल. चांगले रस्ते, स्वच्छ पाणी, उत्तम शिक्षण, दर्जेदार आरोग्य सुविधांचं, देशाच्या राजधानीचं सर्वांगसुंदर शहर हे दिल्लीकरांचे स्वप्न पूर्ण होईल.”एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये अजित पवार यांनी पुढे म्हटले की, “दिल्लीतील भाजपाच्या यशामागे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या कष्ट व निवडणूक व्यवस्थापनाचेही मोठे योगदान आहे. दिल्ली भाजपाचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेव आणि त्यांच्या टीमने घेतलेली मेहनतही महत्वाची ठरली.

”दिल्ली विधानसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कामगिरीवरही अजित पवार यांनी आपल्या पोस्टच्या शेवटी भाष्य केले आहे. ते म्हणाले, “राष्ट्रवादी काँग्रेसला दिल्ली विधानसभेत अपेक्षित यश मिळाले नसले तरी या निवडणुकीतून आम्हाला खूप शिकायला मिळाले आहे.

ही सुरुवात आहे. मिळालेल्या अपयशाचे विश्लेषण करुन भविष्यात देशपातळीवर पक्षबांधणीसाठी अधिक मेहनत घेतली जाईल. दिल्लीसह इतर अन्य राज्यात पक्षाचा विस्तार करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल.”यानंतर प्रक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी एक्सवर भारतीय जनता पक्षाचे अभिनंदन केले असून, त्यांच्या पक्षाला या निवडणुकीत यश का मिळाले नाही, याचे विश्लेषण केले जाणार असल्याचे म्हटले आहेविजयासाठी अभिनंदन करताना आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, “दिल्ली विधानसभेतील निर्णायक विजयाबद्दल, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी नड्डा यांचे मनापासून अभिनंदन.

### व्यवस्थापनाचेही मोठे योगदान

दिल्ली विधानसभा निवडणुकीत ‘एनडीए’चा प्रमुख घटकपक्ष असलेल्या भाजपाला मिळालेल्या ४० हून अधिक जागा या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर दिल्लीकरांनी व्यक्त केलेल्या विश्वासाचे प्रतिक आहेत. केंद्र आणि दिल्ली विधानसभेतही पंतप्रधानांच्या विचारांचे डबल इंजिन सरकार आल्याने दिल्लीच्या विकासाला दुप्पट गती मिळेल. चांगले रस्ते, स्वच्छ पाणी, उत्तम शिक्षण, दर्जेदार आरोग्य सुविधांचं, देशाच्या राजधानीचं सर्वांगसुंदर शहर हे दिल्लीकरांचे स्वप्न पूर्ण होईल.”एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये अजित पवार यांनी पुढे म्हटले की, “दिल्लीतील भाजपाच्या यशामागे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या कष्ट व निवडणूक व्यवस्थापनाचेही मोठे योगदान आहे.

---

# केजरीवाल यांच्या पराभवानंतर अण्णा रडले

## अण्णा हजारे यांना केजरीवालांबाबत बोलताना अश्रू अनावर

।कोल्हापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दिल्ली विधानसभेचा निकाल लागला आहे. भाजपाने निर्विवाद बहुमत मिळवलं आहे. त्यामुळे दिल्लीत भाजपाचा मुख्यमंत्री होणार ही बाब निश्चित आहे. दरम्यान अरविंद केजरीवाल, मनिष सिसोदिया यांच्यासह अनेक दिग्गजांचा पराभव झाला आहे. आम आदमी पक्ष हा अण्णा हजारेंच्या लोकपालच्या आंदोलनातून उभा राहिलेला पक्ष आहे. अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाल्यानंतर अण्णा हजारेंना प्रतिक्रिया विचारली ज्यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले.**



एवढं प्रेम केलं तुमच्यावर, पण तुम्ही रस्ता सोडून गेलात. त्यामुळेच नाईलाजाने तुमच्याविरोधात बोलावं लागलं अशी प्रतिक्रिया देताना अण्णा हजारे भावनिक झाले होते. या आधीही अण्णा हजारे यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका केली होती. ऐन निवडणुकीच्या दिवशी अण्णा हजारे यांनी केजरीवाल हे स्वार्थी असल्याचं म्हटलं होतं. तसंच त्यांच्या पक्षाला मतदान करू नये असंही त्यांनी म्हटलं होतं. दिल्लीकरांनी ‘आप’ला नाकारलं असून स्वतः अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला आहे. निकालाच्या दिवशी अण्णा हजारे यांनी पुन्हा एकदा केजरीवाल यांच्यावर टीका केली आहे अण्णा हजारे म्हणाले की, “हीच आम्ही अपेक्षा ठेवली होती तुमच्याकडून, नाईलाजास्तव आम्हाला बोलावं लागलं. एवढं प्रेम केलं तुमच्यावरती. तुम्ही रस्ता सोडून गेलात म्हणून नाईलाजास्तव बोलावं लागलं.” अरविंद केजरीवाल यांना अनेक गोष्टी शिकवल्या. मात्र त्यांनी समाजाचा विचार केला नाही आणि राजकारणात गेले असे सांगत असताना झाले अण्णा हजारे भावूक झाल्याचं दिसून आलं. अरविंद केजरीवाल यांचे विचार, चारित्र्य शुद्ध नाही म्हणूनच त्यांचा पराभव झाल्याची प्रतिक्रिया ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंनी दिली

### दिल्लीत 27 वर्षांनी कमळ फुललं

आहे. सत्ता, पैसा, दारूची दुकानं डोक्यात गेल्यामुळेच केजरीवाल यांचा पराभव झाला अशी टीका अण्णांनी केली.अण्णा हजारे म्हणाले की, “अरविंद केजरीवाल यांनी ज्यावेळेस राजकारणात जायचा निर्णय घेतला आणि पक्ष काढला त्यावेळेस पासून मी त्यांच्याशी बोलणे बंद केले. पक्ष काढल्यानंतर मी परत त्यांच्याशी कधीही बोललो नाही. त्या दिवसापासून मी संबंध तोडून टाकले. कारण माझ्यापुढे पक्ष विरहित समाजसेवा, देशहित हेचं प्रधान्य होतं आणि आम्हाला तेच हवं आहे. दिल्लीच्या निवडणुकीत २७ वर्षांनंतर जोरदार कमबॅक करत भाजपनं आम आदमी पक्षाचा धुव्वा उडवला. ७० पैकी तब्बल ४८ जागांवर विजय मिळवत भाजपनं दिल्ली काबीज केली.

# भाजपाने घेतला ‘अयोध्या’ पराभवाचा बदला

## मिल्कीपूर पोटनिवडणुकीत मोडून काढले सपाचे आव्हान

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विधानसभा निवडणुकीबरोबर उत्तर प्रदेशातील मिल्कीपूर विधानसभा मतदारसंघाचीही पोटनिवडणूक पार पडली होती. या प्रतिष्ठीत लढतीत भाजपाने विजय मिळवला असून, चंद्रभानू पासवान यांनी समाजवादी पक्षाचे उमेदवार अजित प्रसाद यांना ६१,७१० मतांनी पराभूत केले.**



फैजाबाद लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या मिल्कीपूर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपा ने सर्वस्व पणाला लावले होते. कारण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत फैजाबादमध्ये भाजपाचा पराभव झाला होता आणि याच मतदारसंघात अयोध्येचाही समावेश आहे. भाजपाच्या या पराभवानंतर त्यांची देशभरातून खिल्ली उडवण्यात आली होती. फैजाबादमधून लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले सपाचे उमेदवार अवधेश प्रसाद यांनी मिल्कीपूरच्या आमदारकीचा राजीनामा दिला होता, त्यामुळे ही पोटनिवडणूक लागली होती. यावेळी भाजपाच्या उमेदवारासमोर अवधेश प्रसाद यांचे पुत्र अजित प्रसाद सपाचे उमेदवार होते. भाजपाच्या विजयावरून असे दिसून येते की, मुलिम आणि यादव मतदार समाजवादी पक्षाच्या उमेदवाराबरोबर राहिले असले तरी, पासी आणि इतर अनुसूचित जाती समुदाय भाजपाच्या मागे उभे राहिला आहे. दरम्यान लोकसभा निवडणुकीत, पासी समुदायाच्या मतदारांनी समाजवादी पक्षाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती. पण, आता परिस्थिती बदलली आहे. अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या मिल्कीपूर विधानसभा मतदारसंघात सुमारे १.२५ लाख अनुसूचित जातीचे मतदार आहेत. त्यापैकी सुमारे ७०,००० पासी समाजाचे आहेत. तर मुस्लिम आणि यादव समाजाचे मतदार अनुक्रमे सुमारे ५५,००० आणि ३२,००० इतके आहेत. दुसरीकडे चौरसिया, विश्वकर्मा, मौर्य आणि चौहान यांसारख्या इतर मागासवर्गीयांनी भाजपला पाठिंबा दिल्याचे दिसून येते. ज्यांची संख्या ३० हजार इतकी आहे.मुस्लिम आणि यादव वगळता जवळजवळ सर्व समुदायातील लोकांचा अजित यांच्या पोटनिवडणुकीतील उमेदवारीला विरोध झाल्याचे पाहायला मिळाले. त्यांचे असे मत होते की, सपाने दुसऱ्या कोणत्याही उमेदवाराला उमेदवारी दिल्यास चुरशीची लढाई झाली असती. तर मतदारसंघातील काहींचे असे मत होते की, फैजाबादचे खासदार लोकसभा विजयानंतर अहंकारी झाले असून, त्यांच्या मुलांप्रमाणे ते नागरिकांसाठी अनुपलब्ध झाले आहेत. याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले आहे. अनेक पासी-बहुल गावातील लोकही अजित यांच्या उमेदवारीवर नाराज होते. त्यांचा असा दावा आहे की, अवधेश यांनी त्यांच्या मुलाला उमेदवारी देत त्यांच्यासोबत काम करणाऱ्यांचा विचार केला नाही. त्यामुळे पासवान त्याच समुदायाचे असल्याने त्यांना संधी मिळायला हवी. दुसरीकडे मिल्कीपूर विधानसभेची पोटनिवडणूक जिंकण्यासाठी जिंकण्यासाठी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सर्वाधिक प्रयत्न केले. यासाठी त्यांनी स्वतः प्रचाराची जबाबदारी घेतली होती. निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्र्यांनी आठपेक्षा जास्त वेळा मतदारसंघाला भेट दिली. याचबरोबर प्रचारासाठी नऊ मंत्री आणि ४० आमदारांनाही मतदारसंघात पाठवले होते. फैजाबाद लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या मिल्कीपूर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजपा ने सर्वस्व पणाला लावले होते. कारण २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत फैजाबादमध्ये भाजपाचा पराभव झाला होता आणि याच मतदारसंघात अयोध्येचाही समावेश आहे. भाजपाच्या या पराभवानंतर त्यांची देशभरातून खिल्ली उडवण्यात आली होती.

### सपा उमेदवाराला विरोध

फैजाबादमधून लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले सपाचे उमेदवार अवधेश प्रसाद यांनी मिल्कीपूरच्या आमदारकीचा राजीनामा दिला होता, त्यामुळे ही पोटनिवडणूक लागली होती. यावेळी भाजपाच्या उमेदवारासमोर अवधेश प्रसाद यांचे पुत्र अजित प्रसाद सपाचे उमेदवार होते.भाजपाच्या विजयावरून असे दिसून येते की, मुलिम आणि यादव मतदार समाजवादी पक्षाच्या उमेदवाराबरोबर राहिले असले तरी, पासी आणि इतर अनुसूचित जाती समुदाय भाजपाच्या मागे उभे राहिला आहे. दरम्यान लोकसभा निवडणुकीत, पासी समुदायाच्या मतदारांनी समाजवादी पक्षाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली होती. पण, आता परिस्थिती बदलली आहे. अनुसूचित जातींसाठी राखीव असलेल्या मिल्कीपूर विधानसभा मतदारसंघात सुमारे १.२५ लाख अनुसूचित जातीचे मतदार आहेत. त्यापैकी सुमारे ७०,००० पासी समाजाचे आहेत. तर मुस्लिम आणि यादव समाजाचे मतदार अनुक्रमे सुमारे ५५,००० आणि ३२,००० इतके आहेत. दुसरीकडे चौरसिया, विश्वकर्मा, मौर्य आणि चौहान यांसारख्या इतर मागासवर्गीयांनी भाजपला पाठिंबा दिल्याचे दिसून येते. ज्यांची संख्या ३० हजार इतकी आहे.

# काँग्रेसचा अजेंडा नक्षलवादाला खतपाणी घालणारा

## पंतप्रधान मोदी यांनी केजरीवाल यांच्या आपदाला नाकारलं

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतल्या निकालांवर भाषण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अरविंद केजरीवाल यांच्या आपदाला नाकारलं हे तर म्हटलंच आहे, या शिवाय काँग्रेसला दिल्लीकरांनी जागा दाखवली आहे असं म्हणत काँग्रेसवरही जोरदार टीका केली आहे.**



जनतेने काँग्रेसला कठोर संदेश दिला आहे. दिल्लीतल्या निवडणुकीत काँग्रेसने शून्याची डबल हॅटट्रीक लावली आहे. देशाच्या राजधानीत देशाच्या सर्वात जुन्या पक्षाचा सलग सहावेळा पराभव झाला आहे. त्यांना खातंही उघडता आलेलं नाही. काँग्रेसचे लोक स्वतःला पराभवाचं सुवर्ण पदक देत आहेत. काँग्रेसवर कुणाचाही विश्वास उरलेला नाही. मी मागच्या वेळी म्हटलं होतं काँग्रेस हा परजिवी पक्ष झाला आहे. हा पक्ष स्वतःही डुबतो आणि सहकारी पक्षांना डुबवतो. काँग्रेस पक्ष आपल्या सहकाऱ्यांना संपवणारा पक्ष आहे.”आत्ताची काँग्रेस सहकारी पक्षांची भाषा, त्यांचा अजेंडा चोरण्यात मश्गुल झाली आहे. त्यांचे मुद्दे चोरायचे आणि मग त्यांची व्होटबँक चोरायची. उत्तर प्रदेशात समाजवादी पक्ष आणि बसपा यांचे मुद्दे चोरुन त्यांची व्होट बँक ताब्यात घेण्याच्या तयारीत आहे. तामिळनाडूमध्ये डीएमकेची भाषा काँग्रेस पक्ष आणखी जोरात बोलते आहे. कारण काँग्रेसला तिथे स्वतःची जागा बनवायची आहे. बिहारमध्येही जातीयवादाचं विष पसरवण्याचं काम काँग्रेसने केली आहे. जम्मू काश्मीरमध्ये सहकाऱ्यांची अशीच अवस्था काँग्रेस केली आहे. दिल्लीतही हे स्पष्ट झालं आहे की जो काँग्रेसचा हात धरतो तो बुडतोच हे निश्चित असतं. असं मोदी म्हणाले आहेत. राजकारणाचा जे अभ्यास करतात त्यांना मी सांगू इच्छितो की २०१४ नंतर काही लोकांनी हिंदू व्हायचा प्रयत्न केला. मंदिरात जायचं, माळा घालायच्या हे सगळं करुन त्यांना वाटलं आपण भाजपाची मतं चोरु, पण काही उपयोग झाला नाही. त्यानंतर मागच्या वर्षात त्यांनी हे मार्ग बंद केले. मग जायचं कुठे? तर विविध राज्यांमध्ये जे प्रादेशिक पक्ष आहेत त्यांच्यावर काँग्रेसची नजर आहे.

### काय घडलं तुम्हीच बघा...

काँग्रेस आता छोट्या पक्षांना, स्थानिक पक्षांना खाण्याचं काम करते आहे. इंडि आघाडीचे पक्ष काँग्रेसचं धोरण समजलं आहे. दिल्लीत आपण पाहिलं की इंडि च्या नेत्यांनी काँग्रेसला थांबवण्याचा प्रयत्न केला हे दिसून आलं आहे. इंडिया आघाडी काँग्रेसच्या विरोधात दिल्लीत उतरली. तरीही काय घडलं तुम्हीच बघा. असंही मोदी यांनी म्हटलं आहे.काँग्रेस म्हणजे बरबादी कारण काँग्रेस म्हणजे तो पक्ष उरलेला नाही जो स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी आणि त्यानंतरची काही दशकं होता. आज काँग्रेस पक्ष शहरी दहशतवादाचं राजकारण करतो आहे.

# धर्मेंद्र त्यांच्या घरात घुसले होते



दिलीप कुमार(DILIP KUMAR) यांनी 'फूटपाथ', 'नदिया के पार', 'मुसाफिर', 'तराना', 'विधाता', 'मशाल', 'सुपर नानी', 'क्रांती', 'धर्म अधिकारी', 'द फोर्ट', अशा अनेक चित्रपटांतून काम करीत प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. त्यांचा चाहतावर्ग मोठा होता. त्यामध्ये बॉलीवूड अभिनेते धर्मेंद्र यांचाही समावेश आहे. धर्मेंद्र चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण करण्याआधीपासूनच दिलीप कुमार यांचे फार मोठे चाहते होते. धर्मेंद्र जेव्हा पंजाबमध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेत होते, तेव्हा त्यांना वाटायचे ते व दिलीप कुमार हे एकमेकांचे भाऊ असून, ते बॉलीवूडवर राज्य करीत आहेत. त्यानंतर मुंबईला गेल्यावर ते थेट दिलीप कुमार यांच्या घरात गेले होते. हा किस्सा धर्मेंद्र यांनी दिलीप कुमार यांच्या आत्मचरित्रात सांगितला आहे.दिलीप कुमार : द सबस्टन्स अँड द शॅडो या आत्मचरित्रात धर्मेंद्र यांनी दिलीप कुमार यांच्या पहिल्या भेटीची आठवण सांगताना म्हटले की, १९५२ साली जेव्हा मी लुधियानामध्ये शिक्षण घेत होतो. त्यावेळी मला दिलीप कुमार व मी भाऊ आहोत, असे वाटू लागले होते. मी एकदा मुंबईत आलो होतो. त्याच्या दुसऱ्याच दिवशी मी त्यांच्या वांद्रे येथील बंगल्यावर पोहोचलो. तेथे गेटवर सुरक्षा रक्षक नव्हता. त्यामुळे मी दिलीप कुमार यांच्या थेट घरात पोहोचलो. मला कोणीही थांबवण्यासाठी तिथे नव्हते. तर मी वरच्या बेडरूमच्या दरवाजाजवळ गेलो. तिथे सोफ्यावर गोरा, सडपातळ व देखणा असा एक माणूस झोपलेला मला दिसला. माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसत नव्हता. मी त्यांच्याकडे पाहत असल्याची जाणीव होताच दिलीप कुमार झोपेतून जागे झाले. मला पाहताच ते थोडे घाबरले. त्यांनी त्यांच्या घरात काम करणाऱ्या व्यक्तीला हाक मारली. त्यानंतर मी घाबरत जिना उतरलो आणि तिथून पळ काढला.

# कंगना मनातलं गेली बोलून!

कंगनाची एखादी पोस्ट म्हणजे कोणता ना कोणता वाद होणारच असे चित्र काही महिन्यांपासून रुढ झाले आहे. कंगना ही नेहमीच तिच्या पोस्टमुळे चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. कंगनाला बोलण्यासाठी, परखडपणे व्यक्त होण्यासाठी कोणताही विषय पुरतो. यावेळी मात्र ती जरा वेगळ्या अँगलनं व्यक्त होताना दिसत आहे. कंगनानं चक्क विश्वसुंदरी ऐश्वर्या रॉयचे कौतुक केले आहे. कंगनानं तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर ऐश्वर्या रॉयच्या पीएस १ या चित्रपटावर दिलेली प्रतिक्रिया त्यात तिचं केलेलं कौतुक हा चर्चेचा विषय होत आहे. त्या चित्रपटातील एका मुव्ही क्लिपचा व्हिडिओ कंगनानं शेयर केला आहे. त्यात पीएस १ मधील नंदिनी (ऐश्वर्या) ही कुंदवईशी (तृषा) संवाद साधताना दिसते. कंगनानं तो व्हिडिओ शेयर करुन विश्वसुंदरी ऐश्वर्याचं कौतुक केलं आहे. ती म्हणते,

बॉलीवूडमधील गीतकारांनी सोळाव्या वर्षातील अभिनेत्रींच्या सौंदर्याविषयी खूप काही लिहिलं आहे. त्यावर गाणी रचली आहे. मात्र ४० आणि ५० व्या वर्षातील अभिनेत्रींविषयी फार कमी गाणी आपल्याकडे आहे. त्याचे एक कारण या वयातील अभिनेत्री सेन्शुलिटी, सेक्शुलिटी आणि सिडक्शनचे सादरीकरण करण्यात कमी पडतात. असे त्यांना वाटते. मात्र यासगळ्याला ऐश्वर्या रॉय याला सगळ्याला अपवाद आहे. तिचं सौंदर्य हे तुम्हाला भुरळ घालणारं आहे. ती केवळ सुंदरच नाही तर स्मार्ट आहे. चतूर आहे. याचे बेस्ट कॉम्बिनेशन म्हणून तिच्याकडे पाहावे लागेल. तिच्या या सगळ्या गुणांसाठी मी तिला दोन फुल मून देईन. अशा शब्दांत कंगनानं ऐश्वर्याची स्तुती केली आहे. तिच्या त्या पोस्टवर नेटकऱ्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. ऐश्वर्याच्या सौंदर्याचे लाखो चाहते आहेत. तिच्या फोटोंना आणि व्हिडिओंना मिळणारा प्रतिसादही मोठा आहे. केवळ भारतातच नाहीतर जगभरामध्ये ऐश्वर्यावर होणारा कौतुकाचा वर्षाव मोठा आहे. यात बॉलीवूडची क्वीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंगनानं ऐश्वर्याची केलेली स्तुती चर्चेत आली आहे.



# लग्नाला यायचं हं!

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री परिणीती चोप्रा आणि आपचे खासदार राघव चड्ढा यांचा काही दिवसांपूर्वी साखरपुडा झाला होता. त्यानंतर राघव यांना काही जणांनी आता लग्नाची तारीख कधी असा प्रश्न विचारुन भंडावून सोडले होते. यासगळ्यात परिणीती अन् राघव यांच्या लग्नाची तारीख समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून परिणीती ही तिच्या लग्नाच्या बातमीवरुन चर्चेत आली आहे. तिच्या साखरपुड्याच्या फोटोंनी चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. साखरपुड्याला बरेच दिवस उलटले तरी लग्नाच्या तारखेविषयी कोणतीही बातमी न आल्यानं चाहत्यांना प्रश्न पडला होता. त्याबाबतची एक बातमी सध्या नेटकऱ्यांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. परिणीतीचा होणारा पती राघव चड्ढा यांनी देखील दिलेल्या एका प्रतिक्रियेनं सोशल मीडियावर चर्चा होती. मनोरंजन क्षेत्रामध्ये परिणीती आणि राघव चड्ढा यांची जोडी टॉक ऑफ द टाऊन आहे. फोटो आणि व्हिडिओमुळे ते लाईमलाईटमध्ये आहेत. त्यांचे लग्न कधी होणार असा प्रश्न केवळ चाहत्यांनाच नाहीतर बॉलीवूड सेलिब्रेटींना देखील आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, परिणीती आणि राघव चड्ढा यांच्या लग्नाची तारीख जाहीर झाली आहे. १३ मे रोजी या दोन्ही सेलिब्रेटींचा साखरपूडा झाला होता.



# श्रद्धा आणि सबुरी!

मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय मालिका 'आई कुठे काय करते' प्रेक्षकांच्या चांगल्याच पसंतीस उतरली आहे. मालिकेतील सर्वच व्यक्तिरेखांना प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलंय. गेल्या ३ वर्षापासून ही मालिका प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. आई कुठे काय करते मालिकेवर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केलंय आणि आजही मालिका तितकिच लोकप्रिय आहे. आई कुठे काय करते मालिकेचा 1000 वा भाग काही दिवसांपुर्वी प्रदर्शित झाला. 7 डिसेंबर 2019 मालिकेचा पहिला भाग प्रदर्शित झाला होता. तेव्हा पासून ही मालिका प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत टीआरपीच्या लिस्टमध्ये पहिल्या तीन स्थानावर ठाण मांडून बसली आहे. 'आई कुठे काय करते' मालिकेचे 1000 भाग पुर्ण झाल्याचा आनंद मालिकेच्या टिमने साजरा केला.

# सलमान आणि ऐश्वर्याने चोरून केलेला निकाह?

मुंबई - सलमान खान आणि ऐश्वर्या राय यांच्या अफेअरची चर्चा बॉलिवूडमध्ये अनेक वर्षांपासून सुरू आहे. सलमानसोबतच्या ब्रेकअपनंतर ऐश्वर्याने अभिषेक बच्चन सोबत लग्न केलं. लग्नानंतर ऐश्वर्या आणि अभिषेकला एक मुलगी झाली असून तिचं नाव आराध्या ठेवण्यात आलं. मात्र, सलमान अजूनही सिंगल आयुष्य जगत आहे. सलमान आणि ऐश्वर्या यांनी गुपचूप लग्न केल्याच्या अफवा पसरल्या होत्या, त्यावर अभिनेत्रीने सर्वांची बोलती बंद केली होती सलमान खान आणि ऐश्वर्या राय जेव्हा एकमेकांना डेट करत होते तेव्हा त्यांनी गुपचूप लग्न केल्याच्या अफवा पसरल्या होत्या. लोणावळ्यातील एका बंगल्यामध्ये त्यांनी निकाह केला असं म्हटलं गेलं होतं. लग्नासाठी ऐश्वर्याने इस्लम धर्म स्वीकारल्याची अफवासुद्धा पसरली होती. रिपोर्टनुसार, असं सांगण्यात आलं होतं की, सलमान आणि ऐश्वर्याच्या लग्नाला त्यांचे आई-वडील उपस्थित नव्हते. इतकंच नव्हे तर हे जोडपं हनीमूनसाठी न्यूयॉर्कला गेल्याच्या चर्चा होत्या. ऐश्वर्याच्या आई-वडिलांचा या नात्याला विरोध होताच त्यामुळे चर्चा अधिक वाढल्या होत्या. ऐश्वर्या राय आणि सलमान खानच्या लग्नाची अफवा पसरली असताना, अभिनेत्रीने शांतपणे सगळ्या गोष्टी हाताळल्या . मीडियासमोर ही अफवा खोटी असल्याचं सांगत ऐश्वर्या म्हणाली होती की, 'जर हे घडलं असतं मिळाला नाही. जर असं झालं असतं तर मी स्वतःहून माझ्या लग्नाची घोषणा केली असती. पण लग्न करायला वेळ कुठे आहे? राज ठाकरे यांच्यासारखी दिसणारी ती व्यक्ती कोण? तेजस्विनी पंडितच्या त्या फोटोंमुळे चर्चेला उधाणइंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीमध्ये सलमानसोबतच्या ब्रेकपचं कारण सांगताना ऐश्वर्याने सांगितलं होतं की, सलमान तिच्यासोबत गैरवर्तन करायचा. शारीरिक आणि मानसिक त्रास द्यायचा.

# विराटच्या अनुपलब्धतेमुळे संधी!

## अय्यरची प्रतिक्रिया; पहिल्या सामन्यातील निर्णायक खेळीबाबत समाधानी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंग्लंडविरुद्ध पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात ३६ चेंडूंत ५९ धावांची झंझावाती खेळी करणाऱ्या श्रेयस अय्यरला या सामन्यासाठी भारताच्या अंतिम ११ खेळाडूंत स्थानही मिळणार नव्हते. सामन्याच्या पूर्वसंध्येला विराट कोहलीच्या गुडघ्याला दुखापत झाली. त्याच्या अनुपलब्धतेमुळेच आपल्याला संधी मिळाल्याचे श्रेयसने सामन्यानंतर सांगितले.**




नागपूर येथे झालेल्या या सामन्यात २४९ धावांचा पाठलाग करताना भारताची २ बाद १९ अशी स्थिती झाली होती. यावेळी फलंदाजीला आलेल्या श्रेयसने इंग्लंडच्या गोलंदाजांवर हल्ला चढवत दोन षटकार आणि नऊ चौकारांची आतषबाजी केली. त्याच्या तडाखेबंद फलंदाजीमुळे भारताचा विजयाचा मार्ग सुकर झाला. भारताने हा सामना जिंकून तीन सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली. या सामन्यात सलामीवीर यशस्वी जैस्वालला एकदिवसीय पदार्पणाची संधी मिळाली. कोहलीला दुखापत झाल्याने जैस्वालला खेळवले जात असल्याचा जाणकार आणि चाहत्यांचा समज होता. मात्र, प्रत्यक्षात श्रेयसला संघाबाहेर ठेवले जाणार होते.‘काल (सामन्याच्या आदल्या रात्री) मजेशीर किस्सा घडला. मी सिनेमा पाहत बसलो होतो. उद्या खेळायचे नसल्याने आपण आणखी थोडा वेळ जागे राहू शकतो असा मी विचार केला. मात्र, त्याच वेळी मला कर्णधार रोहित शर्माचा फोन आला. विराटच्या गुडघ्याला सूज आहे, त्यामुळे कदाचित तुला खेळण्याची संधी मिळू शकेल असे त्याने मला सांगितले. मी लगेच सिनेमा बंद केला आणि झोपायला गेलो. संघाच्या यशात मी योगदान देऊ शकलो याचे समाधान आहे,” असे श्रेयस म्हणाला. “मी या सामन्यात खेळणे अपेक्षित नव्हते. दुर्दैवाने विराटला दुखापत झाली आणि त्याला सामन्याला मुकावे लागले. त्याच्या अनुपलब्धतेमुळे मला खेळता आले. मात्र, मी यासाठी पूर्णपणे तयार होतो. आपल्याला कधीही संधी मिळू शकेल, आपण त्यासाठी सज्ज असले पाहिजे असाच मी विचार केला. गेल्या वर्षी आशिया चषकात असेच काही घडले होते. मी जायबंदी झाल्याने दुसऱ्या खेळाडूला संधी मिळाली आणि त्याने शतक झळकावले. यावेळी मी दुसऱ्या बाजूला होतो,” असे श्रेयसने सांगितले.विराट कोहलीच्या गुडघ्याची दुखापत गंभीर नसून तो रविवारी कटक येथे होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यासाठी उपलब्ध असणे अपेक्षित आहे, असे भारतीय संघाचा उपकर्णधार शुभमन गिलने सांगितले. “कोहलीची दुखापत गंभीर नाही. पहिल्या सामन्यासाठीच्या सरावादरम्यान त्याला फारसा त्रास जाणवला नाही. सामन्याच्या दिवशी सकाळी उठल्यानंतर गुडघ्याला सूज असल्याचे त्याला जाणवले. त्यामुळे तो खेळू शकला नाही. मात्र, आम्ही निश्चिंत आहोत. तो दुसऱ्या सामन्यात खेळेल याची आम्हाला खात्री आहे,” असे गिल म्हणाला. लय परत मिळविण्यासाठी आणि तंदुरुस्तीत सुधारणा करण्यासाठी आपल्याला देशांतर्गत क्रिकेटची खूप मदत झाल्याचे श्रेयस म्हणाला. “मी देशांतर्गत क्रिकेटचा संपूर्ण हंगाम खेळलो. यातून मला खूप शिकायला मिळाले. चांगल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत कसे रूपांतर करायचे, कशी मानसिकता राखायची हे मी शिकलो. तसेच माझ्या तंदुरुस्तीतही खूप सुधारणा झाली,” असे श्रेयसने नमूद केले. नागपूर येथे झालेल्या या सामन्यात २४९ धावांचा पाठलाग करताना भारताची २ बाद १९ अशी स्थिती झाली होती. यावेळी फलंदाजीला आलेल्या श्रेयसने इंग्लंडच्या गोलंदाजांवर हल्ला चढवत दोन षटकार आणि नऊ चौकारांची आतषबाजी केली. त्याच्या तडाखेबंद फलंदाजीमुळे भारताचा विजयाचा मार्ग सुकर झाला.

### विराटच्या गुडघ्याला सूज आहे

भारताने हा सामना जिंकून तीन सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी मिळवली. या सामन्यात सलामीवीर यशस्वी जैस्वालला एकदिवसीय पदार्पणाची संधी मिळाली. कोहलीला दुखापत झाल्याने जैस्वालला खेळवले जात असल्याचा जाणकार आणि चाहत्यांचा समज होता. मात्र, प्रत्यक्षात श्रेयसला संघाबाहेर ठेवले जाणार होते.‘काल (सामन्याच्या आदल्या रात्री) मजेशीर किस्सा घडला. मी सिनेमा पाहत बसलो होतो. उद्या खेळायचे नसल्याने आपण आणखी थोडा वेळ जागे राहू शकतो असा मी विचार केला. मात्र, त्याच वेळी मला कर्णधार रोहित शर्माचा फोन आला. विराटच्या गुडघ्याला सूज आहे, त्यामुळे कदाचित तुला खेळण्याची संधी मिळू शकेल असे त्याने मला सांगितले. मी लगेच सिनेमा बंद केला आणि झोपायला गेलो. संघाच्या यशात मी योगदान देऊ शकलो याचे समाधान आहे,” असे श्रेयस म्हणाला. “मी या सामन्यात खेळणे अपेक्षित नव्हते. दुर्दैवाने विराटला दुखापत झाली आणि त्याला सामन्याला मुकावे लागले.

# मेस्सीच्या मुलाचे एकाच सामन्यात तब्बल ११ गोल

## थियागो मेस्सीही आपल्या वडिलांच्या मार्गावर चालला आहे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लिओनेल मेस्सीची गणना जगातील महान फुटबॉलपटूंमध्ये केली जाते. लिओनेल मेस्सीने आपले नाव जगभर प्रसिद्ध केले आहे. मेस्सीने आपल्या शानदार खेळाच्या जोरावर जगभरात लाखो चाहते बनवले आहेत. २०२२ मध्ये अर्जेंटिनाला फुटबॉल विश्वचषक जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा मेस्सीचा मुलगा थियागो मेस्सीही आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत आहे.**




थियागो केवळ १२ वर्षांचा आहे, मात्र या लहान वयात त्याने एकाच सामन्यात ११ गोल करून सर्वांनाच चकित केले आहे. थियागोने एकाच सामन्यात एकापाठोपाठ एक असे ११ गोल करत लोकांना वेड लावले आहे. लिओनेलने आपल्या खेळाने फुटबॉल विश्वात एक वेगळी ओळख निर्माण केली असून आता त्याचा मुलगा थियागोही त्याच्या मार्गावर चालला आहे. थियागोने फुटबॉलच्या दिशेने पावले टाकली असून याचे उत्तम उदाहरण नुकतेच दाखवून दिले आहे. अंडर-१३ एमएलएस चषकाच्या एका सामन्यात त्याने एकामागून एक ११ गोल केले.थियागोने सामन्याच्या पूर्वार्धात ५ गोल केले. यानंतर दुसऱ्या हाफमध्ये त्याने दुहेरी हॅट्रिक केली. अशाप्रकारे, त्याने अंडर-१३ एमएलएस चषक स्पर्धेत अटलांटा युनायटेड विरुद्ध त्याच्या संघ इंटर मियामीसाठी जोरदार गोल केले. थियागोने पहिल्या हाफच्या १२व्या, २७व्या, ३०व्या, ३५व्या आणि ४४व्या मिनिटाला गोल केले. यानंतर ५१व्या, ५७व्या, ६७व्या, ७६व्या, ८७व्या आणि ८९व्या मिनिटालाही गोल करण्यात आले.

### एकाहीला एकही गोल करता आला नाही

अंडर-१३ एलएलएस स्पर्धेत, मेस्सीच्या मुलाची जादू अशी होती की त्याने एकट्याने आपल्या संघाला विजयापर्यंत नेले.विरुद्ध संघातील अटलांटा युनायटेडचा कोणताही खेळाडू मेस्सीच्या मुलासमोर टिकू शकला नाही किंवा तो त्याच्या इंटर मियामी संघातील कोणत्याही खेळाडूशी स्पर्धा करू शकला नाही. १२ वर्षीय थियागोने अलीकडेच १३ वर्षाखालील एमएलएस चषक २०२५ मध्ये एकट्याने आपल्या संघाला विजय मिळवून दिला. थियागोशिवाय त्याचा सहकारी डिएगो लुना ज्युनियरने गोल केला. तर अटलांटा युनायटेडच्या एकाही खेळाडूला एकही गोल करता आला नाही.

## किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये मोशीतील प्रियदर्शनी स्कूलच्या

# निधी आंब्रे हिला कांस्यपदक!

### चौथ्या ओपन इंटरनॅशनल किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये नेत्रदीपक कामगिरी

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**प्रियदर्शनी स्कूल मोशी येथील इयत्ता सातवी मधील विद्यार्थिनी निधी आंब्रे हिने इंदिरा गांधी स्टेडियम दिल्ली येथे झालेल्या चौथ्या ओपन इंटरनॅशनल किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकले**

या स्पर्धेत १४ देशांनी भाग घेतला. १५ वर्षाखालील मुलींच्या ५० किलो वजन गटामध्ये निधी हिने कांस्यपदक पटकावले.

या स्पर्धा एक ते पाच फेब्रुवारी दरम्यान पार पडल्या. क्रीडा शिक्षक संकेत गावडे आणि प्राची बेल्हेकर यांनी विद्यार्थ्यांसाठी परिश्रम घेतले.

शाळेचे व्यवस्थापकीय विश्वस्त नरेंद्र सिंग म्हणाले, निधी हिने केलेली कामगिरी शाळेसाठी कौतुकस्पद आहे.

क्रीडा क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी चमकवे यासाठी शाळेकडून विशेष प्रयत्न केले जातात. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांना चांगला खेळ करता यावा यासाठी शाळेकडूनच तज्ञ प्रशिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.



## तंत्रज्ञान स्पर्धेतून तांत्रिक कौशल्यांना चालना : डॉ. प्रमोद पाटील

### शिक्षण विश्व : 'पीसीसीओईआर' आयोजित 'रोबोराष्ट्र' स्पर्धेत केपीआर, राजराजेश्वरी, नोव्हेल इंटरनॅशनल स्कूल संघ प्रथम

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पुरंदर विमानतळ हे पुण्याच्या विकासाला चार पटीने पुढे नेणार आहे. हा जिल्हा विकासचे इंजिन आहे. आज पुण्याच्या विकासातला मध्यमार्ग हे विमानतळ आहे.त्यामुळे जोपर्यंत नवीन विमानतळ बांधले जात नाही, तोपर्यंत आंतरराष्ट्रीय शहर म्हणून पुण्याची असलेली ख्याती मिळू शकत नाही. त्यासाठी पुरंदर विमानतळ होणे आवश्यक आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट पीसीईटी संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्चच्या वतीने 'रोबोराष्ट्र २५' या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातील महाविद्यालयांतील १०१ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. रेस्क्युलर ऑलिंपिक, यंत्रोत्सव सिनियर, ज्युनिअर या तीन विभागांत स्पर्धा झाली. युविरा ३ केपीआर कोईम्बतुर, पिनाकल माइंड्स राजराजेश्वरी अभियांत्रिकी महाविद्यालय, बेंगळुरू, रणवीरसिंग राजपूत नोव्हेल इंटरनॅशनल स्कूल या संघांनी प्रथम क्रमांक पटकावला.

यावेळी पीसीसीओईआरचे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, संगणक विभागाच्या प्रमुख डॉ. अर्चना चौगुले, डॉ. महेंद्र साळुंके आदी उपस्थित होते.

सहभागी विद्यार्थ्यांना नवीन शक्यतांचा शोध घेण्यास मदत होऊन लक्षणीय प्रगती होऊ शकते, असे डॉ. अर्चना चौगुले म्हणाल्या.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी स्पर्धेतील विजेत्या संघांना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे संयोजन डॉ. महेंद्र साळुंके, आदित्य परदेशी, ओम खरे, खुशी रोहरा, चंद्रकांत राऊत आणि इतर समिती सदस्यांनी केले.




**स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढील प्रमाणे**

रेस्क्युलरऑलिंपिक – प्रथम क्रमांक – युविरा ३ (केपीआर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था केपीआरआयईटी कोईम्बतुर); द्वितीय क्रमांक – सम्यंक घंगाळे (डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय आकुर्डी) आणि तृतीय क्रमांक – युविरा झेड (केपीआर अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था कोईम्बतुर) तसेच यंत्रोत्सव सिनियर टीम – प्रथम क्रमांक – पिनाकल माइंड्स (राजराजेश्वरी अभियांत्रिकी महाविद्यालय, बेंगळुरू), द्वितीय क्रमांक – बीओटी (डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय आकुर्डी) आणि तृतीय क्रमांक – रोबोयुश (वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय सांगली); यंत्रोत्सव ज्युनियर टीम – प्रथम क्रमांक रणवीरसिंग राजपूत नोव्हेल इंटरनॅशनल स्कूल, द्वितीय क्रमांक – अर्जुन आनंद अरबुज (प्रियदर्शिनी स्कूल) आणि तृतीय क्रमांक – वॉर मशीन जेएन पेटिट टेक्निकल हायस्कूल यांना मिळाला. पीसीईटी चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी यशस्वी संघ व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## 'दिल्ली विजयानंतर पिंपरी चिंचवड भाजपचा जल्लोष

### फटाके फोडून, पेढे वाटून कार्यकर्त्यांनी केला आनंद व्यक्त

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला ऐतिहासिक विजय मिळाला आहे. त्यामुळे 27 वर्षानंतर दिल्लीमध्ये पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन होणार आहे. दिल्लीतील या विजयाचा भाजपा पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने जल्लोष करण्यात आला. भाजपा मध्यवर्ती कार्यालय, मोरवाडी येथे भाजपा पदाधिकाऱ्यांनी फटाके फोडून आतषबाजी करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात दिल्लीकर जनतेने भाजपला दिलेला हा ऐतिहासिक विजय असल्याची दावा भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

यावेळी, भाजपा कार्यकारी अध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस शितल शिंदे, अजय पाताडे, संजय मंगोडेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, मनोज तोरडमल, मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, देवदत्त लांडे, कैलास सानप, रवींद्र देशपांडे, प्रीती कामतीकर, गणेश ढाकणे, दत्ता यादव, पोपट हजारे, राकेश नायर, दीपक भंडारी, नेताजी शिंदे, खंडूदेव कठारे, महेश बरसावडे, भूषण जोशी, प्रमोद ताम्हणकर यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कार्यालय परिसरात फटाके फोडून, पेढे वाटून फुगड्या खेळत आनंद व्यक्त केला.




Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!

## आरओ प्लांटवर सलग

# दुसऱ्या दिवशी कारवाई!

### दहा आरओ प्लांट आणि सात आरओ पाण्याच्या एटीएम प्लांट्स सील

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गिलियन बेरे सिंड्रोमचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कठोर पाऊले उचलण्यास सुरूवात केली असून दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या अनधिकृत खाजगी आरओ प्लांट्सची तपासणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत आढळून आलेल्या अशा १० आरओ प्लांटवर आज महापालिकेने कारवाई केली असून संबंधित चालकांना प्लांट तात्काळ बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती माहिती आयुक्त शेखर यांनी दिली.**

गिलियन-बॅरे सिंड्रोम प्रादुर्भाव व वाढत्या सार्वजनिक आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने खाजगी आरओ प्लांट्सच्या पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करण्यात येत आहे. त्यामध्ये अनधिकृत खाजगी आरो वॉटर ऑपरेटर्स दूषित पाणी वापरून पाण्याची बॉटलिंग करून पुरवठा करत असल्याचे निदर्शनास आले होते. असे दूषित पाणी प्रामुख्याने बोअरवेल्स व उघड्या जलस्त्रोतांमध्ये आढळते. नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आणि भविष्यातील आरोग्यविषयक समस्या टाळण्यासाठी सध्या शहरात दूषित पिण्याचा पुरवठा करणाऱ्या अनधिकृत वॉटर बॉटलिंग आणि आर.ओ प्लांट्सवर तात्काळ कारवाई केली जात आहे. पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, प्लंबर यांच्या समन्वयाने क्षेत्रीय कार्यालयनिहाय या प्लांट्सची तपासणी केली जात आहे. यामध्ये फ क्षेत्रीय कार्यालय २, ड क्षेत्रीय कार्यालय २ आरओ प्लांट तर ७ एटीएम आरओ प्लांट, ब क्षेत्रीय कार्यालय १, ग क्षेत्रीय कार्यालय ४ आणि ह क्षेत्रीय कार्यालय १ आरओ प्लांटचा समावेश आहे. आर.ओ प्रकल्प (प्लांट) बंद बाबतच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर वैद्यकीय विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येणार आहे. गिलियन बेरे सिंड्रोमच्या (GBS) पार्श्वभूमीवर आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शहरातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळावे, यासाठी अनधिकृतपणे दूषित पाण्याची बॉटलिंग करणाऱ्या आरओ प्लांट्सवर कठोर कारवाई केली जात आहे.




पाणी हे आरोग्याचा मूलभूत घटक असल्याने त्याच्या गुणवत्तेचा सखोल आढावा घेतला जाईल, असे पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.

---

## पीसीसीओईमध्ये "पंतप्रधान इंटर्नशिप योजने"बाबत माहिती सत्राचे आयोजन

### शिक्षण विश्व: भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाचा उपक्रम

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पुरंदर विमानतळ हे पुण्याच्या विकासाला चार पटीने पुढे नेणार आहे. हा जिल्हा विकासचे इंजिन आहे. आज पुण्याच्या विकासातला मध्यमार्ग हे विमानतळ आहे.त्यामुळे जोपर्यंत नवीन विमानतळ बांधले जात नाही, तोपर्यंत आंतरराष्ट्रीय शहर म्हणून पुण्याची असलेली ख्याती मिळू शकत नाही. त्यासाठी पुरंदर विमानतळ होणे आवश्यक आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**




निगडी प्राधिकरणस्थित पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचलित पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (पीसीसीओई) मध्ये भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे "पंतप्रधान इंटर्नशिप योजना" संबंधित माहितीसत्राचे आयोजन 11 फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता 'पीसीईटी ऑडिटोरियम' निगडी येथे करण्यात आले आहे या माहितीसत्रात भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाचे अधिकारी या योजनेची संपूर्ण माहिती देणार आहेत. तसेच अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची व गेल्या तीन वर्षात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची या योजनेत ऑनलाईन नोंदणी देखील करून घेण्यात येणार आहे.

"पंतप्रधान इंटर्नशिप योजना" ही भारत सरकारची एक महत्वपूर्ण योजना आहे. या योजनेअंतर्गत 21 ते 24 वयोगटातील तरुणांना देशातील सुमारे 500 अग्रगण्य कंपन्यांमध्ये सुमारे 1 कोटी इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध होणार असून इंटर्नना दरमहा स्टायपेंड देखील दिले जाणार आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश तरुणांना उद्योग क्षेत्रात लागणाऱ्या कौशल्यांनी सुसज्ज करून नोकरीसाठी तयार करणे व त्यांच्या करिअरला चालना देणे हा आहे.

विद्यार्थींनी या माहितीसत्रात सहभागी होऊन "पंतप्रधान इंटर्नशिप योजनेचा" लाभ घ्यावा असे आवाहन पीसीईटीच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे यांनी केले आहे. या माहितीसत्रात सहभागी होण्याकरिता खालील लिंक वर रजिस्ट्रेशन करावे :HTTPS://TINYURL.COM/PMINTERNSHIP22. कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्थ हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई व प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# चंद्र कलाविष्कार : भारती पाटील यांच्या नजरेतून चंद्राच्या विविध कलांचे दर्शन!

## गुजरात येथील ‘कच्छचे रण’ येथे वेगवेगळ्या वेळी टिपल्या चंद्रकला

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**चंद्र आहे साक्षीला चंद्र आहे साक्षीला असा एकुलता एक उपग्रह जो रात्री आपला वाटतो त्याचा शीतल प्रकाश आणि ते चांदणं याचं साहित्य विभागांशी एक वेगळंच नातं दोन प्रेमी जीवांना तो एकमेकांना जोडणारा दुवा वाटतो. सौंदर्याचे उपमा ही चंद्राची व्यक्त पूर्ण होऊ शकत नाही .कधी बहिणीला तो भाऊ वाटतं. भाऊबीजेला जीला भाऊ नाही तिने चंद्राला ओवाळावे अशी प्रथा प्रचलित आहे आणि लहान मुलांचा तो मामा असतो. करवा चौथ, ईद, आणि हिंदू बरेच सण पोर्णिमेला आहेत. हे सगळे सण चंद्राच्या कलेशी संबंधित आहेत.**





चंद्राच्या प्रथमा पासून पौर्णिमेपर्यंत वाढत जाणारा आकार आणि त्यानंतर कमी कमी होत अमावस्या हे सारं खूप सुंदर आहे. असा चंद्र नसता तर.. ना समुद्राला भरती आली असते ना प्रेमाला. अनादि अनंत काळापासून चंद्र पृथ्वीच्या सोबत आहे. तरीही त्याचे आकर्षण आणि गूढ वाटत राहते. आणि अशा चंद्रावरती जितकी गाणी लिहाल, कविता लिहाल तितक्या कमीच आहेत एवढ्या नवीन नवीन प्रतिभा देणारा तो प्रतिभा स्थान आहे. त्यामुळे तो नसता तर हा विचार करण्यापेक्षा त्याच्यावर जेवढं लिहिता येईल तेवढे कमी आहे.

सदरचे छायाचित्र सौ. भारती निलकंठ पाटील यांच्या कॅमेरातून वेगवेगळ्या ठीकणाच्या पार्श्वभूमीवर टिपण्यात आले. वेगवेगळी रूपे आपल्या समोर सादर करण्यात त्यांना यश आले. हा तांबडा चंद्र म्हणजे ‘ ब्लड मून ‘ जो गुजरात येथील ‘ कच्छचे रण ‘ या ठिकाणी दि. १४ जानेवारी पौर्णिमेच्या दिवशी काढण्यात आले. दुसरा चंद्र १५ जानेवारी ला सकाळी ८ वाजता टिपण्यात आला. व शेवटचा चंद्र ५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ८ वाजता टिपण्यात आला.

---

# ‘अजिंक्य डी वाय पाटील’ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणाबरोबरच केली ग्राम स्वच्छता!

## देहूगाव येथील श्रमदान शिबिरात स्वच्छ भारत सुंदर भारतचा संदेश

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**लोहगाव येथील अजिंक्य डी वाय पाटील स्कूल ऑफ इंजीनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक योजनेअंतर्गत श्री क्षेत्र देहूगाव येथे ग्राम स्वच्छतेचा संदेश दिला. संत तुकाराम महाराज शिळा मंदिर परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र, तसेच इंद्रायणी घाटाची विद्यार्थ्यांनी सफाई केली. याबरोबरच विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण देखील केले.**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अजिंक्य डी वाय पाटील स्कूल ऑफ इंजीनियरिंग लोहगाव यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर हवेली तालुक्यातील श्री क्षेत्र देहूगाव येथे नुकतेच पार पडले.

शिबिराचे उद्घाटन प्रमुख पाहुणे श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहूचे अध्यक्ष हभप पुरुषोत्तम महाराज मोरे यांच्या हस्ते झाले. देहू नगरपंचायत मुख्याधिकारी निवेदिता घार्गे, देहू नगरपंचायत पदाधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. महाविद्यालयाच्या संचालिका डॉ कमलजीत कौर व प्राचार्य डॉ एफ बी सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे संयोजन राष्ट्रीय स्वयंसेवक योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. दिलीप बाळासाहेब घुले यांनी केले. स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना सोबत घेऊन वृक्षारोपण, प्राथमिक आरोग्य केंद्र स्वच्छता, तुकाराम महाराज संस्थान शिळा मंदिर तसेच गावातील सार्वजनिक परिसर स्वच्छ करून स्वच्छ भारत सुंदर भारतचा संदेश गावकऱ्यांपर्यंत पोहोचवला. स्वयंसेवकांनी जलसंवर्धन अभियानांतर्गत गावालगतच्या इंद्रायणी नदी घाट परिसर स्वच्छ करून तीर्थक्षेत्र विकास अभियानाचे महत्त्वपूर्ण काम केले. श्रम संस्कारासोबतच स्वच्छता फेरी, पथनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत करून ग्रामस्थांपर्यंत स्वच्छतेची जनजागृती स्वयंसेवकामार्फत करण्यात आली.

देहू नगराध्यक्ष पूजा दिवटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एफ बी सय्यद, विभाग प्रमुख डॉ पंकज आगरकर, डॉ भाग्यश्री ढाकुलकर, डॉ नागेश शेळके आदींनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. शिबिर कालावधीत सोमनाथ आबा मसुगडे, उत्कर्ष पाटील, सनी पाटील, महेश गिरी, प्रा .अमृता मोरे, प्रा. जयश्री सूर्यवंशी, प्रा.श्रद्धा खंदारे यांचे सहकार्य लाभले. शिबिर कालावधीत विठ्ठल काळोखे यांचे व्यक्तिमत्व विकास, डॉ नाना शेजवळ यांचे डिजिटल साक्षरता, प्राध्यापक रोहित गुरव यांचे मैत्री व बाप, ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे यांचे माय युवा भारी आदी विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. शिबिर यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. दिलीप घुले व अजिंक्य डी वाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सर्व रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

---

# अजिंक्यडीवायपाटीलस्कूलऑफ इंजीनियरिंगच्या विद्यार्थ्यांकडून 280 रक्त पिशव्यांचे संकलन!

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून अजिंक्य डी वाय पाटील स्कूल ऑफ इंजीनियरिंग मध्ये रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने 280 रक्तपिशव्यांचे संकलन झाल्याची माहिती संस्थेच्या संचालिका डॉ कमलजीत कौर यांनी दिली.

लोहगाव येथील अजिंक्य डी वाय पाटील स्कूल ऑफ इंजीनियरिंग राष्ट्रीय छात्र सेना विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अक्षय ब्लड बँक हडपसर यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महाविद्यालय प्राचार्य डॉ एफ बी सय्यद, डॉ एस एम खैरनार, डॉ राहुल बचुटे, डॉ पंकज आगरकर, डॉ भाग्यश्री ढाकुलकर, निवृत्त लेफ्टनंट कर्नल संजय करोडपती, प्रा.रोहित गरड, डॉ सानिया अन्सारी, डॉ नागेश शेळके आदींनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

शिबिरात निशुल्क रक्तगट तपासणी करण्यात आली. रक्तदान शिबिरास अक्षय ब्लड बँक हडपसर यांचे सहकार्य लाभले . राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी लेफ्टनंट प्रा. अनिकेत नेमाडे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक दिलीप बाळासाहेब घुले यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी शिबिर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

